## Anekant Education Society's
# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 251 | Displayed on :21/08/2024

## भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२४–२०२५

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, व व्यावसायिक (व्होकशनल) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी पदवी वर्गातील प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना नवीन अर्ज व पदवी वर्गातील व्दितीय व तृतीय वर्षासाठी व पदव्युत्तर वर्गातील प्रथम व व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना नूतनीकरण करणेसाठी अर्ज ऑनलाईन **(Online)** पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

### केंद्रशासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ आक्टोंबर २०२४ आहे.

नवीन मंजूरीसाठी (**Fresh**) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या **Top 20th Percentile Merit List** मध्ये समावेश आहेत ते सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या यादीत नाव असेल अशाच विद्यार्थ्यांनी फॉर्म भरावयाचा आहे व सदर विद्यार्थ्यांनी दुस–या कोणत्याही शिष्यवृत्तीचा फॉर्म भरलेला नसावा.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

<u>किमान पात्रता व अटी :–</u>

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. **अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.**
३. अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राव्दारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पाच वर्षापर्यंत शिष्यवृत्ती देय राहील.

<u>अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :–नवीन मंजुरी/**(Fresh)**</u>

१. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका
२. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका–याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

**नूतनीकरणासाठी आवश्यक कागदपत्रे <u>(Renewal)</u>**

१. मागील वर्षाची गुणपत्रिका

- <u>नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती:–</u>

१. **सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी** <u>www.scholarships.gov.in</u> या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.
२. **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०२४ ही आहे.**
३. नवीन मंजुरीसाठी ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक मंडळाच्या TOP 20 th Percentile merit list समावेश असेल त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या <u>www.dhpune.gov.in</u> या संकेतस्थळावर लवकरात लवकर प्रसिध्द् करण्यात येईल. तसेच **HSC, CBSE** व **ICSE** या बोर्डचे TOP 20 th Percentile merit list समावेश असेल असे विद्यार्थी सुध्दा या शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत.
४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधारक्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांनी आधारक्रमांक या पर्यायाचा वापर करुन फॉर्म भरावा. आधारकार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांनी आधार नोंदणी आय.डी.स्लीप किंवा बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न (लिंक) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

६. ऑनलाईन अर्ज भरताना होम पेज वरील सर्व माहिती वाचून अर्ज भरावा व ऑनलाईन अर्ज भरुन झाल्यानंतर परिपूर्ण अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासहित महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

७. विद्यार्थ्यांचे बँक खाते चालू स्थितीत असने (Opererative /Active Mode ) आवश्यक आहे. जेणेकरुन शिष्यवृत्ती रकमेचे वितरण अयशस्वी (Fail ) होणार नाही.

८. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईट खाते नसावे. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चुक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विद्यार्थ्यांची राहील.

९. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Home Page वरील (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

११. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

१२. एखादा पात्र विद्यार्थी नुतनीकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतु ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.

१३. एखादया पात्र विद्यार्थ्याचा नुतनीकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतु ज्या वर्षाचा अर्ज करावयाचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

तरी, विद्यार्थ्यांनी नवीन व नूतनीकरण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट आवश्यक त्या कागदपत्रांसहित वरील प्रमाणे सूचनेनुसार दि. ३१/१०/२०२४ पर्यंत 'प्रशासन भवन' शिष्यवृत्ती विभागात येथे जमा करावेत. जे विद्यार्थी फॉर्म व आवश्यक कागदपत्रे याची हार्ड कॉपी जमा करणार नाही अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म पुढे पाठविले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

प्राचार्य

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

D:\jadhavns\jadhavns\Scholarship 2023-2024\Central cector Sch... 2023-2024\... Sector Scholarship Notice 2020-21.docx